दिनांक २३-०८-२०१६

# प्रेस नोट

परभणी जिल्हयातील नगरपरिषद मानवत, सोनपेठ, सेलू, पाथरी, गंगाखेड,पूर्णा, जिंतूर हया नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणूका-२०१६ मध्ये होणार असून त्याकरिता मतदारांनी मतदार यादी मध्ये नांव नोंदणी करुन घ्यावी. सदरील मतदार नोंदणीचे काम ३१ ऑगष्ट ,२०१६ पर्यंत सुरु असून मतदारयादीमध्ये नांव नोंदणी केलेल्या मतदारांनाच नगर परिषदांच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकाचे वेळी मतदानात सहभागी होता येईल.

प्रत्येक नगर परिषद क्षेत्रात राहणा-या नागरीकांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन घेउन आपले मतदारयादी मध्ये नांव समाविष्ट करुन घ्यावे . सदरील कामासाठी प्रत्येक नगर परिषद क्षेत्रामध्ये बी.एल.ओ.च्या नियुक्त्या केलेल्या आहेत . महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयामध्ये Collection center उघडलेले आहेत त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी मतदार नांव नोंदणीचे कामासाठी घ्यावा .

नागरीकांनी मतदार नोंदणीकरीता बी.एल.ओ.ची मदत घ्यावी. त्याचप्रमाणे प्रत्येक नगरपरिषद क्षेत्रात हेल्पसेटंर उघडण्यात आलेले आहे त्याचाही उपयोग नागरीकांनी करुन घ्यावा व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन श्री राहुल रंजन महिवाल , जिल्हाधिकारी परभणी यांनी केले.

जिल्हाधिकारी परभणी.

प्रतिलिपी.

१. जिल्हा माहिती अधिकारी परभणी यांना देण्यात येवून सूचीत करण्यात येते की, सदरील प्रेसनोट वृत्तपत्रात प्रसिध्दीस द्यावी.

—sd—
जिल्हाधिकारी परभणी.

1610